Listening Paragraph

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एकदा एका  राजाने आपल्या मुलांसाठी राजवाड्याजवळ एक मोठ्ठा तलाव बांधला आणि त्यात मुलांना खेळण्यासाठी मासे सोडले. तलाव तयार झाल्यावर त्याची मुलं तलाव पाहायला गेली. त्या तलावात सगळ्या माशांबरोबर एक बेडूकपण होते. राजाच्या मुलांनी त्याअगोदर बेडूक कधीही पाहिलेले नव्हते. ते राजाला जाऊन सांगतात कि तलावात त्यांना न आवडणारा एक बेढब प्राणी आहे.

राजा लगेचच त्याच्या शिपायांना सांगतो की त्या बेढब प्राण्याला मारून टाका. तेव्हा शिपाई तलावाच्या काठावर उभे राहून आपापसात काय करायचे ते ठरवू लागतात. कोणी सांगतात त्याला जाळून टाका, चिरडून टाका. सर्वांच्या वेगवेगळ्या सूचना येतात. शेवटी पाण्याला घाबरणारा वृद्ध शिपाई सांगतो की 'त्या प्राण्याला दूर वाहत्या पाण्यात फेकून द्या म्हणजे तो वाहत जाऊन खडकावर आपटेल आणि मरेल. ते ऐकून हुशार बेडूक म्हणाले "मला पाण्यात फेकू नका नाहीतर मी मरून जाईन.

बेडकाची याचना ऐकून शिपाई त्याला पटकन पाण्यात फेकून देतात. बेडूक जोरजोरात हसू लागते आणि म्हणते "या मूर्ख लोकांना माहित नाही की, मी पाण्यात किती सुरक्षित आहे."

१) वरील उताऱ्यात कुठला प्राणी माशांबरोबर तलावात होता?

२) मुलांनी तो प्राणी तलावातून बाहेर का काढायला सांगितला?

३) शिपाई विचार का करू लागले?

४)"मला पाण्यात फेकू नका नाहीतर मी मरून जाईन." असे बेडूक का म्हणाला?

५) तुम्हाला ह्या गोष्टीतून काय कळले?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

Listening paragraph

मेरी कोम ही एकमेव भारतीय महिला बॉक्सर आहे, जिने आपल्या महान कामगिरीने भारताला अभिमान वाटावा अशा महान महिलेचे नाव आहे. २०१२ मध्ये मेरीने ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली आणि कांस्यपदक जिंकले. भारतीय बॉक्सर महिला पहिल्यांदाच आली होती. तिने सहा वेळा वर्ल्ड बॉक्सर चॅम्पियनशिपही जिंकली आहे. मेरीने वयाच्या अठराव्या वर्षी बॉक्सिंगला सुरुवात केली.

मेरी कोम ही संपूर्ण भारत देशाची प्रेरणा आहे; तिचे जीवन चढ-उतारांनी भरलेले आहे. ती इम्फाल, मणिपुर ची राहणारी. मॅग्निफिसेंट मेरी असे टोपणनाव तिला मिळाले होते. बॉक्सिंगमध्ये करिअर करण्यासाठी तिने खूप प्रयत्न केले आणि कुटुंबासोबत संघर्षही केला. यावर्षी मेरी कोम टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतीय बॉक्सिंग संघाचा भाग म्हणून भाग घेत आहे. मेरी कोम पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट होती, दोन्ही फेऱ्या जिंकल्या. तिने पुढील फेरीत, प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला. या सामन्यात कोलंबियाचा इंग्रिट व्हॅलेन्सिया प्रतिस्पर्धी होता.या सामन्यात मेरी कोमचा २-३ अशा गुणांनी पराभव झाला. परिणामी, ती गेममधून बाहेर पडली. मेरी कोमने या सामन्याची तिसरी आणि अंतिम फेरी ३-२ ने जिंकली, पण पहिल्या फेरीतील पराभव ६ वेळच्या विश्वविजेत्यासाठी खूप जास्त होता. त्यामुळे टोकियो ऑलिम्पिकमधील मेरी कोमचा प्रवास तिथेच संपला.

आता ती यातून बाहेर पडली आहे.२५ एप्रिल २०१६ रोजी, भारताच्या राष्ट्रपतींनी कोमला भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह, राज्यसभेचे सदस्य म्हणून नामित केले. मार्च २०१७ मध्ये, भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने अखिल कुमार यांच्यासह मेरी कोमची बॉक्सिंगसाठी राष्ट्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली.

१. मेरी कोमने किती वेळेला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप जिंकली आहे?

२. मेरी कोम कोणत्या राज्यात राहत होती?

३. तिने वयाच्या कोणत्या वर्षी बॉक्सिंगला सुरवात केली?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

४. तिला कोणत्या आणखी एका नावाने ओळखले जायचे?

५. आता ती कोणते काम करते?

Reading Paragraph

यूरोपात ग्रीस नावाचा एक लहानसा देश आहे. त्या देशात मॅसिडोनिया नावाचे छोटे राज्य होते. तेथील राजाचे नाव फिलिप. तो पराक्रमी होता. त्याने सर्व ग्रीस देश जिंकला. अलेक्झांडर उर्फ सिकंदर हा त्याचा मुलगा. राजपुत्र अलेक्झांडर लहानपणापासून हुशार आणि पराक्रमी होता. सिकंदरला गुरु अरस्तूने जग जिंकण्याचं स्वप्न दाखविलं. वीस वर्षांचा असतांनाच तो ग्रीसचा राजा झाला. आपण सर्व जग जिंकावे अशी त्याची महत्वाकांक्षा होती. राजा झाल्या बरोबर त्याने प्रचंड सैन्य बरोबर घेतले आणि ग्रीस देशाबाहेर निघाला. त्याने अनेक देश जिंकले. मिस्र, सिरिया, बैक्ट्रिया, इराण, अफगाणिस्थान हे देश जिंकून तो भारताच्या अगदी दाराशी येऊन पोहोचला. वाटेत लागणारी राज्ये त्याने जिंकली. अलेक्झांडरच्या सैन्यापुढे कोणाचा टिकाव लागला नाही. शेवटी आपले सैन्य घेऊन विजयी अलेक्झांडर भारताच्या सीमेवर तो व्यास नदी पर्यंत येऊन पोहोचला.आतापर्यंतच्या विजयाच्या धुंदीत त्याला कल्पना नव्हती की इथून पुढे त्याला मातब्बर देशप्रेमी लढवय्यांना सामोरे जायचे आहे आणि त्यातच आता त्याचे शिपाई सततच्या होणाया युद्धाला आणि वाटचालीला कंटाळले होते.भारतात सिकंदराचा पहिला सामना हा तक्षशीला राज्याचा राजकुमार अंभी ह्याच्याशी झाला. पण अंभीने शरणागती पत्करावी लागली. तक्षशीला विश्वविद्यालयातील आचार्य चाणक्य ह्यांना भारतावर कुठल्या परदेशी राजाचं आक्रमण पटलं नाही.लम नदीच्या तीरावर सिकंदर आणि पोरस ह्यांच्यामध्ये झालेलं युद्ध हे सिकंदराच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचं युद्ध होतं. आपलं विश्व विजयाचं स्वप्न तुटताना बघून सिकंदर खचून गेला. वयाच्या ३३ व्या वर्षी त्याचा मृत्यू झाला.

1. वरील उताऱ्यात सिकंदरचे खरे नाव काय आहे?
2. सिकंदर कोणत्या देशाचा राजा होता?
3. त्याने देश बाहेर जाऊन कोणते देश जिंकले?

- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

4. त्याच्या गुरूंचे नाव काय?
5. त्याने भारत कोणत्या राजाबरोबर त्याच्या आयुष्यातले सर्वात महत्वाचे युद्ध केले?

Reading Paragraph

पेले हा एकमेव खेळाडू आहे ज्याने तीन विश्वचषक सामने जिंकले आहेत. ह्यशिवाय राष्ट्रीय संघासाठी सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम पेलेच्या नावावर आहे. वयाच्या अवघ्या १७व्या वर्षी पेले विश्वचषक जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. वयाच्या २९व्या वर्षी त्याने १००० गोल केले तो दिवस होता १९ नोव्हेंबर १९६९.

पेले विश्वचषकातील सर्वाधिक गोल कारणाऱ्यांच्या यादीत १२ गोलांसह सहाव्या आणि ब्राझिल मधे रोनाल्डोनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. पेलेने आपल्या खेळाच्या आयुष्यात एकुण ९२ वेळा हॅट्रीकस् केल्या. ३१ प्रसंगी चार गोल केले, ६ प्रसंगी ५ गोल केले आणि एकदा एकाच सामन्यात आठ गोल करण्याचा विक्रम केला. पेले आणि महान गॅरीचा एकत्र खेळले तेव्हा ब्राझीलने एकही सामना गमावला नाही. अश्या ह्या अजिंक्य खेळाडूचा २९ डिसेंबर २०२२ मृत्यु झाला, त्याला आमचा मानाचा सलाम!

१. वरील उताऱ्यात कोणत्या खेळाडूची माहिती आपल्याला मिळते?

२. हा खेळाडू कोणत्या देशाचा होता?

३. त्याने किती विश्वचषक जिंकले?


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

४. विश्वचषकातील सर्वाधिक गोल कारणाऱ्यांच्या यादीत त्याचा कितवा क्रमांक आहे?

५. कोणत्या वयात त्याने विश्वचषक जिंकला?


- Produced by BMM Shala Exam Committee
- © Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
- All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.